**प्रेसनोट** दिनांक १०/०८/२०२१

भद्रकाली पोलीस स्टेशन, जिल्हा नाशिक ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक ४४/२०२१ वेळ १९:१३, दिनांक १०/०८/२०२१.

१) श्रीमती वैशाली वीर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परीषद, नाशिक २) ज्ञानेश्वर सूर्यभान येवले, शासकीय वाहन चालक व ३) पंकज दशपुते, प्राथमिक शिक्षक, जिल्हा नाशिक यांना लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | | |
|---|---|---|
| ॲन्टी करप्शन ब्युरो / घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोद क्रमांक | :- | भद्रकाली पोलीस स्टेशन, जिल्हा नाशिक ठाणे दैनदिनी नोंद क्रमांक ४४/२०२१ वेळ १९:१३, दिनांक १०/०८/२०२१ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) श्रीमती वैशाली पंकज वीर, वय-४५ वर्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परीषद, नाशिक राह. १०१, ॲरो पोलीस सोसायटी, थत्ते नगर, गंगापुर रोड, जि. नाशिक<br>२) ज्ञानेश्वर सूर्यभान येवले, वय-४९ वर्षे, शासकीय वाहन चालक, राहणार श्री साई रो हाऊस नं.२, श्वेता गॅस गोडाऊन जवळ, मेहरधाम पेठ रोड, नाशिक<br>३) श्री. पंकज रमेश दशपुते, वय-३८ वर्षे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा नाशिक, राहणार बी-५, गोविंदा अपार्टमेंट, रामेश्वर नगर, नाशिक |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ९,००,०००/- रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | तडजोडी अंती स्विकारलेली ८,००,०००/- रूपये |
| थोडक्यात हकीकत | :- | यातील तक्रारदार काम करत असलेल्या शिक्षण संस्थेच्या ०४ शाळांना शासनाकडून २०टक्के अनुदान मंजुर झालेले आहे. सदर मंजुर अनुदाना प्रमाणे नमुद शाळेतील एकूण ३२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची पदनिश्चिती करून शासकीय नियमानुसार त्यांचे नोहेंबर २०२० पासुन थकीत वेतन काढूण देण्याकरीता तसेच मंजुर झालेल्या अनुदानाप्रमाणेचे वेतन पुढे नियमित सुरु ठेवण्याकरीता यातील आलोसे क्रमांक १ यांचे वतीने आलोसे क्र.३ यांनी तक्रारदार यांचेकडे दिनांक ०६/०७/२०२१ रोजी ९,००,००० रुपये लाचेची मागणी केली त्यानंतर दिनांक २७/०७/२०२१ रोजीचे पडताळणी दरम्यान आलोसे क्र.१ यांनी तडजोडीअंती ८,००,००० रुपये स्विकारण्याचे मान्य करुन पुढील व्यवहार त्यांचे चालक आलोसे क्र.२ यांचेशी करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे दिनांक १०/०८/२०२१ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. २ येवले यांनी आलोसे क्र.१ श्रीमती वीर यांचेवतीने तक्रारदार यांचेकडून ८,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता आलोसे क्र.२ यास रंगेहात पकडून कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ व ३ यांना देखील ताब्यात घेण्यात आलेले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी- मा. श्री.डॉ. पंजाबराव उगले. सो. पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिति असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

सपंर्क पत्त्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ- acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन - acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर- १०६४
दुरध्वनी कमांक - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९, व्हॉटसॲप् कमांक - ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(पल्लवी ढगे-पाटील)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.